लोकमत

# के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक



आयोजित


# सत्कार सोहळा



## मा.ना.श्री. राजेशजी अंकुशराव टोपे सो.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री,
महाराष्ट्र राज्य

यांनी कोरोना काळात राज्याचे
'आरोग्यमंत्री' म्हणून
उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल तसेच



## संस्थेचे अध्यक्ष
## मा.श्री. बाळासाहेब देवराम वाघ

यांचे ९०व्या वर्षात पदार्पण निमित्ताने
के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे
मंगळवार, दिनांक १९/१०/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता

## ।। सत्कार सोहळा ।।

आयोजित करण्यात येत आहे.
तरी सदर कार्यक्रमासाठी आपली ऑनलाइन
उपस्थिती प्रार्थनीय आहे.

### कार्यक्रम वार, दिनांक व वेळ

मंगळवार, दिनांक १९/१०/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता

### कार्यक्रमाचे स्थळ

मिटिंग हॉल नं. २, चौथा मजला, मध्यवर्ती कार्यालय,
के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक

**कार्यक्रमासाठी फेसबुक आणि झूम ऑनलाइन लिंकवर क्लिक करून उपस्थिती दर्शवावी**

- **Facebook Live link**: https://www.facebook.com/engg.kkwagh/live
- **Zoom Meeting link**: https://zoom.us/j/6135960075?pwd=cklDTnJWOSsxRGRTaFZEbU1mOFV6Zz09
- Meeting ID : 613 596 0075
- Passcode : 54321

सकाळ

# वाघ शिक्षण संस्थेतर्फे आज आरोग्यमंत्री टोपे यांचा सत्कार

पंचवटी, ता. १८ : कोरोनाकाळात राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी स्वतः:ची व कुटुंबाची पर्वा न करता महाराष्ट्राच्या जनतेसाठी सर्वस्वी वाहून घेतले. या मोलाच्या कामगिरीबद्दल के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे मंत्री टोपे यांच्या जाहीर सत्काराचे आयोजन मंगळवारी (ता.१९) दुपारी तीन वाजता ऑफलाइन व ऑनलाइन स्वरूपात करण्यात येणार आहे.

संस्थेच्या मध्यवर्ती कार्यालयात दुपारी तीनला सत्कार समारंभ आयोजित केला गेला आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचे हस्ते हा सत्कार केला जाणार आहे. गेल्या अठरा वर्षांपासून बाळासाहेब वाघ हे अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन आणि ॲग्रिकल्चर असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. या तिन्ही असोसिएशनचे महाराष्ट्र राज्यात आठशेहून अधिक महाविद्यालये व तंत्रनिकेतने सभासद आहेत. या सर्व सभासद महाविद्यालयांचे संस्थाचालक, प्राचार्य, पदाधिकारी व स्टाफ हे ऑनलाइन कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ हे वयाची ८९ वर्ष पूर्ण करून ९० व्या वर्षात पदार्पण करणार असल्याने आरोग्यमंत्री राजेश टोपे यांच्या हस्ते बाळासाहेब वाघ व त्यांच्या पत्नी शकुंतलाताई वाघ यांचा सत्कार आयोजित केला गेला आहे. श्री. वाघ यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त संस्थेच्या शाळा, महाविद्यालय स्तरावर ऑनलाइन व ऑफलाइन विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हा सत्कार सोहळा फेसबुक(https://www.facebook.com/engg.kkwagh/live)व झूमवर (मीटिंग आयडी-६१३ ५९६ ००७५ व पासवर्ड-५४३२१) ऑनलाइन प्रसारित केला जाणार आहे. तरी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

Nashik, Nashik-Today
19/10/2021 Page No. 3

**सोहळा** • आरोग्यमंत्री राजेश टोपे यांचे प्रतिपादन, वाघ संस्थेतर्फे सत्कार

# उच्च शिक्षणामध्ये काळानुरूप बदल करण्याची आवश्यकता

**प्रतिनिधी** | नाशिक

आजच्या स्पर्धेच्या युगातही विद्यार्थ्यांना १० ते १५ वर्षे जुनाच अभ्यासक्रम शिकवला जातो. मात्र परिस्थिती दिवसेंदिवस बदलत असते. भविष्याचा विचार करता काळानुरूप शिक्षणामध्ये बदल होणे गरजेचे आहे. मात्र उच्च शिक्षणामध्ये काळानुसार नवीन अभ्यासक्रमावर भर दिला जात नाही. मोठ्या शैक्षणिक संस्थांनी स्वायत्त होण्याची गरज आहे. या संस्था स्वायत्त अथवा खासगी विद्यापीठ बनले तर अशा संस्था कोणावरही अवलंबून राहणार नाही असे स्पष्ट मत आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी व्यक्त केले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या वतीने कोरोनाकाळात केलेल्या कार्याची दखल घेत मंगळवारी (दि. १९) आरोग्यमंत्री टोपे यांचा तसेच के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांच्या ९० व्या वर्षपूर्तीनिमित्त सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी टोपे बोलत होत. व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, आमदार डॉ. राहुल आहेर, मविप्रच्या सरचिटणीस नीलिमा पवार, शकुंतला वाघ, अशोक मर्चंट, चांगदेवराव होळकर, समीर वाघ, अजिंक्य वाघ, प्रा. के.एस. बंदी आदी उपस्थित होते.




के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या वतीने कोरोनाकाळात केलेल्या कार्याची दखल घेत मंगळवारी आरोग्यमंत्री टोपे यांचा सत्कार करण्यात आला. समवेत मान्यवर.

प्रारंभी राजेश टोपे यांनी सांगितले की, बाळासाहेब वाघ यांचे जीवन हे सर्वांसाठी प्रेरणादायी असेच आहे. पूर्ण आयुष्य त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी खर्च केले आहेत. शिक्षण, सहकार, शेतकरी अशा सर्वच घटकांसाठी त्यांनी कार्य केले. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या विशेषत: मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेले कार्य हे अभिमानास्पद आहे.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते राजेश टोपे व बाळासाहेब वाघ यांच्या सत्कार करण्यात आला. यावेळी बाळासाहेब वाघ यांनी सांगितले की, शिक्षण संस्थांना शासनाच्या वतीने स्कॉलरशीपचे पैसे अद्याप पर्यंत दिलेले नाही. यामुळे शिक्षण संस्था अडचणीत आलेल्या असुन शिक्षकांना अर्धवेतनावर कामे करावे लागत आहे. अशीच परिस्थिती ग्रामणी भागातील शाळा-महाविद्यालयाची असून २० ते २५ वर्ष होवूनही ग्रँट मिळालेले नाही. परिणामी शिक्षकांना तुटपुंज्या वेतनावर काम करावे लागते. मात्र शासनाकडून केवळ शहरी भागातील शाळा-महाविद्यालयांना ग्रँन्ट दिली जाते. यामुळे ग्रामीण भागातील शाळा-महाविद्यालयाचा, विद्यार्थ्यांचा विकास कसा होणार असा सवाल यावेळी वाघ यांनी उपस्थित केला. कार्यक्रमास मोठ्या संख्येने संस्थेचे प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# आरोग्यमंत्री टोपे आज नाशिकमध्ये

म. टा. खास प्रतिनिधी, नाशिक



राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे आज मंगळवार (दि. १८) जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. दुपारी दोन वाजता ते सिव्हिल हॉस्पिटलला भेट देणार असून, सार्वजनिक सुटी असली तरी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी नियमित कामावर यावे असे परिपत्रक जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी काढले आहे. दुपारी एक वाजता टोपे यांचे मुंबई नाका येथील राष्ट्रवादी भवनात आगमन होईल. पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसमवेत ते चर्चा करणार आहेत. दुपारी दोन वाजता ते सिव्हिल हॉस्पिटलला भेट देणार आहेत. दुपारी तीन वाजता के. के. वाघ शिक्षण संस्थेत आयोजित बाळासाहेब वाघ यांच्या सत्कार सोहळ्याला ते उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी साडे सात वाजता इंडोपंप ग्रुपच्या कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन टोपे यांच्या हस्ते होणार आहे.